जा.क्र./उविमम/तेलताड/2782/२०१९
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि.सिंधुदूर्ग
दि. 21 DEC 2019

प्रति,

..................................
..................................
..................................

**विषय: प्रति तास तत्वावर जे. सी. बी. (Hydraulic Excavator (Wheeled) 0.3 Cum/ Loader 1 Cum bucket capacity) भाडयाने घेणेबाबत दरपत्रक पुरविणेबाबत...**

महाशय,

उद्यानविद्या महाविद्यालय मुळदे, ता. कुडाळ, अंतर्गत तेलताड प्रक्षेत्रावर भाडे तत्वावर जे. सी. बी. मार्फत काम करून घ्यावयाचे असून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | अंदाजित कामाचे तास | शेरा |
|---|---|---|---|
| १. | ३० वर्षे वयाची ३०ते ३५ फुट उंचीची २ ते २.५ मी घेराची ३१० तेलताड झाडे जे. सी. बी. व्दारे मुळासहीत काढणे व काढलेली झाडे लागवडी योग्य क्षेत्र सोडून जे. सी. बी. व्दारे प्रक्षेत्रावर वाहतूक करून एकत्रित ढिग करणे . **(टिप — तेलताड प्रक्षेत्रावरील काढावयाच्या तेलताड झाडांची पाहणी करावी.)** | एकुण १०५ तास | जे. सी. बी. (Hydraulic Excavator (Wheeled) 0.3 Cum किंवा Loader 1 Cum bucket capacity) प्रति तासाचा दर नमूद करावा. |

याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, कृपया आपण वरील तपशिलाप्रमाणे दर नमुद करून दरपत्रक या कार्यालयात **दि. १३/०१/२०२०** पर्यत या कार्यालयास प्राप्त होईल अशा तऱ्हेने सादर करावे. उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रकाबाबत अटी खालीलप्रमाणे.**

१) दरपत्रक बंद लखोटयातून सादर करावे व त्यावर " **भाडयाने जे. सी. बी पुरविणेबाबत दरपत्रक"** असे स्पष्ट नमुद करावे.
२) दरपत्रकात दिलेला दर हा सर्व करांसहीत स्पष्टपणे नमुद करावा तसेच सदरचा दर हा शासन परिपत्रक क्र. रादसू –२०१८/प्र.क्र. २७/नियोजन–३ दि. २७/०७/२०१९ मध्ये नमुद सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१९–२० साठी राज्य दरसूचीमधील नमुद दराच्या अधिन असावा.
३) दरपत्रक सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग – ४१६५२० या पत्यावर पोस्टाने पाठवावे.
४) दरपत्रकात या पत्राचा संदर्भ नमुद करावा.
५) टपालद्वारे दरपत्रक पोहोचण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६) सर्व दरपत्रके मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
७) दरपत्रकांवर जी. एस. टी. नंबर नमुद करावा.

आपला विश्वासू

**सहयोगी अधिष्ठाता**
उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

प्रत – १. मा. विस्तार शिक्षण संचालक, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली यांना विनंती करण्यात येते कि, उपरोक्त दरपत्रक मागणीपत्र विद्यापीठ संकेतस्थळावर मुदतीत प्रसिध्द करण्यात यावे.
२. प्रभारी अधिकारी कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र, डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली यांना विनंती करण्यात येते कि, उपरोक्त दरपत्रक मागणीपत्र विद्यापीठ संकेतस्थळावर मुदतीत प्रसिध्द करण्यात यावे.